
CMYK

पोलीस अधिकाऱ्यासह तिघे एसीबीच्या जाळ्यात >>पान 2

केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे संतप्त; खडसे यांनी पंचायत समितीला ठोकळे टाळे >>पान 3

ऋषांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांना आदर्श दाम्पत्य पुरस्कार >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



का वाढवावे लागले देवराच्या तिकिटाचे दर ?
आतील पान

**सुविचार**
आधी विचार करा; मग कृती करा.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 49 ■ बुधवार, दि. 25 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# अॅड. रामेश्वर पळसकर यांच्या लेटरबॉमने मेहकर मतदारसंघात खळबळ



## विकासाच्या मुद्द्यावरून आ.संजय रायमुलकर अडचणीत : मराठा समाजाची नाराजी उघड



*दैनिक आपला विदर्भ*

***मेहकर :** बुलढाणा शहराच्या व बुलढाणा मतदार संघातील विकासकामावरून तसेच बुलढाणा शहरातील अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्यदिव्य स्मारक तसेच सौंदर्यीकरणाच्या तुलनेत मेहकर शहराबरोबरच मतदार संघाचा पाहिजे तसा विकास झाला नसल्याने. त्यामुळे शिवप्रेमी व मराठा समाजाची आ. संजय रायमुलकर यांच्यावर नाराजी असल्याची बाब मेहकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अॅड.रामेश्वर पळसकर यांच्या निवेदनावरून उघड झाली आहे. त्यामुळे आ. संजय रायमुलकर यांच्या अडचणी वाढल्या असून मतदार संघात खळबळ उडाली आहे.*

मेहकर शहरात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्र्वारूढ पुतळा बसवून भव्यदिव्य स्मारक उभारून मेहकर शहराचे सौंदर्यीकरण करण्यात यावे, अशी मागणी मेहकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक अॅड. रामेश्वर पळसकर यांनी मेहकर मतदार संघाचे आ. संजय रायमुलकर यांच्याकडे दि.२४ सप्टेंबर रोजी निवेदनाद्वारे केली आहे.तसेच मेहकर शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा नसल्याने शिवप्रेमी व मराठा समाजाच्यावतीने खंत व्यक्त केली आहे. मेहकर मतदार संघात मराठा समाज मोठ्या संख्येने असून मराठा समाजाचा आपल्या पाठिंबा राहिलेला आहे. परंतु,मेहकर शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व शहराचे सौंदर्यीकरण सुद्धा करण्यात आलेले नाही. त्यांमुळे शिवप्रेमी व मराठा समाजाची तीव्र स्वरूपाची नाराजी आहे. आ. संजय गायकवाड यांनी बुलढाण्याचे बदललेले चित्र पाहता मेहकरमध्ये विकास मात्र नावालाच दिसून येत आहे. त्यामुळे शिवप्रेमी व मराठा समाजाची भावना लक्षात घेता मेहकर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभारावा व शहराचे सौंदर्यीकरण करण्यात यावे, बुलढाणा येथील आमदार संजय गायकवाड यांनी अवघ्या पाच वर्षात बुलढाणा शहरासह मतदार संघाचे चित्र बदलण्याचे काम केल्याने ते मतदारांच्या मनातील आमदार म्हणून दिसून येत आहेत. तसे आ. श्वेता महाले यांनी सुद्धा मतदार संघाचा चेहरामोहरा बदलेला आहे. त्या तुलनेत मेहकर विधानसभेचा विकास झाला नसल्याचे चित्र दिसून येत आहे. अशा निवेदनावरून मतदार संघातील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. भविष्यात या लेटरबॉमचा निवडणुकीत परिणाम होण्याचा अंदाजही राजकीय जाणकारांकडून व्यक्त केला जात आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

मेहकर सौंदर्यीकरण व विकासाच्या मुद्यावरून आता शिवसेना शिंदे गटाचे शिवसैनिकच नाराज असल्याचे दिसून येत आहे. अॅड रामेश्वर पळसकर यांनी दिलेल्या निवेदन म्हणजे मेहकर विधानसभा मध्ये खळबळ माजवणारे एक वादळ असल्याचा बोलल्या जात असून रामेश्वर पळसकर हे शिवसैनिक असून माजी कृषी उत्पन्न बाजार समिती मेहकर चे संचालक पद भूषवले आहे. तर डोणगाव जिल्हा परिषद सर्कल ही सुद्धा त्यांच्याकडेच आहे. या सर्कलमध्ये व समाजामध्ये एक चांगली प्रतिष्ठा असणारे पळसकर आता त्यांनीच मागणी केली असल्यामुळे या निवेदनाचा व या मागणीचा विधानसभेत नक्कीच मोठा परिणाम होण्याची शक्यता आता मात्र नाकारता येत नसून शिवप्रेमीसह समाजाची सुद्धा नाराजी ओढवली जात असल्याचे बोलले जात आहे.

## बुलढाण्याचा पाच वर्षात चेहरामोहरा बदलला





**बुलढाणा विधानसभा मतदार संघाचे आ. संजय गायकवाड यांनी अवघ्या पाच वर्षात बुलढाणा शहरासह मतदार संघात विकासकामे करून शहरासह मतदार संघाचा चेहरामोहरा बदलला आहे. तर चिखली येथील आमदार श्वेता ताई महाले यांनी सुद्धा चिखली मतदारसंघा सह चिखली शहराचा चेहरा मोहरा बदलला आहे. मग मेहकर मतदार संघात आ. संजय रायमुलकर हे १५ वर्षांपासून नेतृत्व करीत आहेत. परंतु, मेहकर शहराचा व मतदार संघाचा सुद्धा विकास पाहिजे तसा का झाला नाही चा प्रश्न आता उद्भवत आहेत. मेहकर मतदार संघात सर्वत्र भकास चित्र असल्याचं बोलल्या जात आहे. विविध समस्या आहेत. त्यामुळे मतदारांमध्ये स्थानिक आमदाराबद्दल प्रचंड नाराजी असल्याचे दिसून येत आहे.**


# राजकोट किल्ल्यावर शिवरायांच्या पुतळ्यासाठी २० कोटी; महायुती सरकारचा निर्णय

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा जारी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर शिवप्रेमींकडून तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या. त्यामुळे पुन्हा याच ठिकाणी शिवरायांचा दिमाखदार पुतळा उभारण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे.


कार्यकारी अभियंता कणकवली यांनी काढलेल्या निविदेनुसार, राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नवीन पुतळ्यासाठी २० कोटींचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. काम पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. इच्छुक शिल्पकारांना दि. ३ ऑक्टोबरपर्यंत शिवरायांच्या प्रस्तावित पुतळ्याचे ३ फूट उंचीचे फायबर मॉडेल सादर करावे लागेल. त्यानंतर दि. ४ ऑक्टोबरला सर्वोत्कृष्ट मॉडेलची निवड होईल.



# सिद्धिविनायक मंदिरात प्रसादाजवळ उंदराची पिल्लं, लाडू कुरतडले; व्हिडीओवरून आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सिद्धीविनायक मंदिरातील प्रसादाचा व्हिडीओ आता व्हायरल होत असून त्यात प्रसाद ठेवलेल्या ट्रेमध्ये उंदराने पिल्लांना जन्म दिल्याचा प्रकार समोर आला आहे. सिद्धिविनायक मंदिराकडून भाविकांना वाटण्यात येणाऱ्या महाप्रसादाच्या लाडूच्या पॅकेटवर ही उंदराची पिल्ले होती. तर काही पाकिटं उंदरांनी कुरतडली होती असंही दिसलं आहे. मंदिर प्रशासनाकडून याची चौकशी करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलंय.



प्रसादाच्या पाकिटाचे आणि ट्रेमध्ये असलेल्या उंदरांच्या पिल्लांचे फोटो आणि व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यात महाप्रसाद ठेवलेल्या ट्रेमध्ये उंदराची पिल्लं स्पष्ट दिसत आहेत. यावर मंदिर प्रशासनाला विचारले असता ट्रस्टच्या सचिव वीणा पाटील यांनी म्हटलं की, फोटोंची पडताळणी करावी लागेल. सीसीटीव्ही फूटेजसुद्धा चेक केले जाईल. सिद्धिविनायक मंदिर परिसरात दररोज प्रसादासाठी ५० हजार लाडू तयार करण्यात येतात. सणांच्या वेळी लाडूची मागणी वाढते. प्रसादासाठी ५० ग्रॅमचे दोन लाडू पाकिटात दिले जातात. अन्न आणि औषध प्रशासनाकडून लाडूसाठी वापरण्यात येणाऱ्या वस्तूंसाठी प्रमाणपत्र दिलं जातं.

लॅब टेस्टनुसार, महाप्रसादाचे हे लाडू आठवडाभर टिकू शकतात. दरम्यान, लाडूच्या पाकिटांवर उंदराची पिल्लं सापडल्यानं स्वच्छतेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्रसादाच्या शुद्धतेबाबतही आता शंका व्यक्त करण्यात येतेय. ट्रस्टच्या सचिव वीणा पाटील यांनी हे फोटो मंदिराच्या आतले नसल्याचं म्हटलंय. पण याचे व्हिडीओ आम्हाला द्यावेत, याची आम्ही चौकशी करू असं म्हटलंय.

# भाजपाच्या मेळाव्यासाठी अमित शाह राज्यात

## आगामी निवडणुकीची रंगणार खलबतं

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** मंगळवारचा दिवस राज्यातील राजकारणासाठी महत्त्वाचा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं भाजपा पदाधिकाऱ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तरी हॉटेल रामा इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार



यांची बैठक होणार आहे. त्यामुळे राज्याच्या निवडणुकीतील राजकीय गणितांची खलबतं रंगणार आहेत. त्यामुळे नेमकी काय चर्चा रंगणार याकडं सर्वांचं लक्ष लागलं आहे.

अमित शाह घेणार आढावा : केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपा नेते अमित शाह मंगळवारी एमजीएम रुक्मिणी सभागृहात भाजपाच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेणार आहेत. जवळपास दोन तास हा मेळावा असणार असून मराठवाड्यातील ४६ मतदार

>> पान २

## मनसेप्रमुख राज ठाकरे अभिनेता सलमान खानच्या भेटीला, भाईजानला खास कार्यक्रमाचं आमंत्रण

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर आधारित 'येक नंबर' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. बुधवार २५ सप्टेंबर रोजी या सिनेमाचा ट्रेलर लॉन्च सोहळा पार पडणार आहे. त्यासाठी सलमान खानला आमंत्रित करण्यासाठी स्वत: राज ठाकरे हे त्याच्या घरी गेले असल्याची माहिती सध्या देण्यात येत आहे.


राज ठाकरे हे सलमानच्या भेटीसाठी त्याच्या घरी वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंट येथे गेले. येक नंबर या सिनेमा ट्रेलर मुंबईतील वांद्रे येथील ताज हॉटेल येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे. यासाठी सलमान खानला राज ठाकरे यांच्याकडून निमंत्रित करण्यात आलं असल्याचं म्हटलं जातंय. पण याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली आहे.

राज ठाकरे यांच्यावर आधारित येक नंबर हा सिनेमा येत्या १० ऑक्टोबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमा अभिनेता धैर्य घोलप हा मुख्य भूमिकेत आहे. या सिनेमा विषय नेमका काय? राज ठाकरे यांचा हा बायोपिक तर नाही असे अनेक प्रश्न सध्या प्रेक्षकांना पडले आहेत.

# भारतीय मुस्लिम महिलेने UNHRC मध्ये CAA चे केले समर्थन

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जिनिव्हा येथील संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेच्या (यूएनएचआरसी) ५७ व्या अधिवेशनात जयपूरच्या मुस्लिम महिला फैजा रिफत यांनी भारताच्या नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला (सीएए) पाठिंबा दर्शविला आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तानमधील धार्मिक अल्पसंख्याकांसाठी नागरिकत्वाचा मार्ग मोकळा करण्याचे सीएएचे उद्दिष्ट रिफत यांनी यावेळी अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, ज्यांना त्यांच्याच देशांत छळाचा सामना करावा लागला, अशांना आश्रय आणि कायदेशीर दर्जा देऊन सीएए





तातडीची गरज पूर्ण करते.

बांगलादेशातील हिंदूंवर झालेल्या हल्ल्यांना अधोरेखित करत पुढे त्या म्हणाल्या, सीएएची अंमलबजावणी यासाठी महत्त्वपूर्ण आहे कारण बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांना सतत छळ आणि निवडक हिंसाचाराचा सामना करावा लागतो आहे. हा कायदा अशा व्यक्तींना सुरक्षित वातावरणात स्थलांतर करण्यासाठी एक महत्त्वाचा पर्याय प्रदान करतो. रिफत यांनी पुढे हे देखील स्पष्ट केले की, सीएए छळातून पळून गेलेले अस्सल निर्वासित आणि बेकायदेशीर स्थलांतरित यांच्यात फरक करण्यासही मदत करते.

CMYK

## भारत सर्वांना हवा आहे...

अमेरिकेत नवीन राष्ट्राध्यक्ष निवडणुकीची धांदल सुरू असताना क्वाड परिषदेसह विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दौरा सुरू झाला आहे. भारताच्या सत्ताधाऱ्यांचा हा दौरा अमेरिकेशी भविष्यातील संबंध कसे असतील आणि त्याचा जगावर आणि विशेषत: आशियाई देशांवर काय परिणाम होईल याचा विचार सध्या सर्वत्र सुरू आहे. चीनला आव्हान देणारा असा हा दौरा ठरेल. अमेरिकेला भारतासारखा देश चीनला त्यांच्या खंडातच पर्याय ठरेल असा नावा असे वाटते. दोन देश दोन वेगवेगळे विचार करत असले तरी त्यांची सध्याची वाटचाल ही भविष्यातील भारताच्या विकासातील एक महत्त्वाची घडामोडी ठरू शकते. त्यामुळे याकडे सकारात्मक दृष्टीनेच पाहिले पाहिजे. भारताकडे इंडो– पॅसिफिकमध्ये चीनच्या वाढत्या प्रभावाला आव्हान देणारा देश म्हणूनही उर्वरित जगाकडून पाहिलं जातं. पंतप्रधा मोदींबरोबर बायडेन यांची ही भेट महत्त्वाची मानली जात आहे. बायडेन यांच्या कारकीर्दीचाही शेवट सुरू झाला आहे. ट्रम्प की कमला हॅरीस विजयी होणार याबाबत मोठी चुरस लागलेली आहे. अशावेळी भारत आणि अमेरिका संबंध पुढे कशी वाटचाल करतात हे महत्त्वाचे ठरते. अमेरिकेतील दोन्हीही प्रमुख पक्षांना भारताची साथ हवी आहे. सत्ताधारी बदलले तरी अमेरिकेचे काही बाबतीतील धोरण बदलत नाही. केवळ तपशीलात थोडाफार बदल होतो. त्यामुळे सध्याच्या सत्ताधाऱ्यांशी किंवा पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांशी पुन्हा जुळवून घेणे फारसे अवघड जाणार नाही. उलट भारत प्रत्येकाला हवा असल्या राष्ट्राध्यक्ष बायडेन यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस काय महत्त्वाचे घटित होते याकडे जगाचे लक्ष असेल. गेल्या पाव शतकाचा विचार केला तर १९९८ मध्ये झालेल्या अणुचाचण्यांनंतर दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले होते. त्यानंतर २००० मध्ये तेव्हाचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात वाजपेयींच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात भारताचा ऐतिहासिक दौरा केला. पुढे हे संबंध अधिक दृढ झाले, ते ऑक्टोबर २००८ मध्ये. भारत अमेरिका यांच्यातील सर्वात महत्त्वाच्या अशा भारत–अमेरिका अणुकरारावर स्वाक्षरी करण्यात आली. तत्कालिन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या टप्प्यात हा करार करण्यात आला होता. त्यावेळी यासाठी भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी आपले सरकार पणाला लावले होते. यानंतर भारताबाबतीत अमेरिकेचे धोरण अधिक लवचिक होत गेले. बायडेन यांच्या कार्यकाळात त्यात भरच पडली. ट्रम्प यांच्याशी मोदींचे असलेले जवळचे संबंध बायडेन यांच्या काळात अडचणीचे ठरतील असे वाटत होते. मात्र तसे काही झाले नाही. २००६ मध्ये अमेरिकन सिनेटचे सदस्य म्हणून बायडेन यांनी २०२० मध्ये भारत आणि अमेरिका हे जगातील सर्वात जवळचे मित्र असतील असे वक्तव्य केले होते. पुढे भारत अमेरिका अणू करार झाला. बायडेन सत्तेवर आल्यानंतर अफगाणिस्तानमधून अमेरिकन सैन्य मागे घेण्याचे तसेच पाकिस्तानशी संबंध बिघडण्याचे परिणाम पाकिस्तानला जबर धक्का बसण्यात झाला. चीनच्या आक्रमकतेला लगाम घालायचा असेल तर भारताची प्रगती झाली पाहिजे. भारत हाच देश चीनला पर्याय म्हणून एक जागतिक उत्पादन हब बनू शकतो असे वातावरण निर्माण झाले. या वातावरणाचा फायदा घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुढे वाटच करायची आहे. भारतात उत्पादन क्षेत्राचा विकास झपाट्याने होणे आणि त्यात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येच्या हाती रोजगार उपलब्ध होणे ही भारताची प्रमुख गरज आहे. ही गरज पूर्ण करायची तर त्यासाठी अमेरिकेचे साह्य महत्त्वाचे आहे. अमेरिकेत नवे अध्यक्ष येत असताना पंतप्रधान मोदी यांचा हा दौरा पहाता जुने अध्यक्ष बायडेन आणि होऊ घातलेल्या अध्यक्षपदासाठीचे दावेदार कमला हॅरीस किंवा डोनाल्ड ट्रम्प यांच्यापैकी कोणीही सत्तेवर आले तरी त्यांना भारताला घेऊन वाटचाल करावी लागेल आणि ती वाटचाल सोपी व्हावी या दृष्टीने मोदी यांचे सध्याचे प्रयत्न यशस्वी होणे ही काळाची गरज आहे. यापूर्वीही उल्लेख केल्याप्रमाणे अमेरिका आपल्या राष्ट्राचे हित सर्वात प्रथम मानत असते. त्यामुळे चीन बाबतीतील त्यांचे धोरण बदलण्याची शक्यता नाही. अगदी ट्रम्प किंवा हॅरीस कोणीही सत्तेवर आले तरी त्या धोरणात बदल होणे शक्य नाही. अशावेळी भारताचा या धोरणातील सहभाग भारताला उत्कर्षाकडे नेणारा ठरू शकतो. जगभरात सु असणाऱ्या तणावपूर्ण आणि संघर्षाच्या वातावरणात लोकशाही पद्धतीने जगाचा व्यवहार व्हायला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करत क्वाड परिषदेत मोदी म्हणाले की, आम्ही कोणाच्याही विरोधात नसून कायद्यावर आधारित असणारी एक आंतरराष्ट्रीय व्यवस्था तयार करू पाहत आहोत. त्याचबरोबर सर्वभौमत्व आणि क्षेत्रीय अखंडतेचा मान ठेवत सर्व मुद्द्यांवर शांततापूर्व पद्धतीने तोडगा काढण्याचा प्रयत्न करत आहोत. अलीकडच्या काळात चीनने भारताच्या बाबतीत केलेल्या आगळीकीचे फळ त्यांच्या पदरात पडण्याची वेळ आलेली आहे. जगातील इतर राष्ट्राची कुरापतखोरी केल्याने चीनला त्यांच्या भरभराटीच्या काळात नजीकच्या देशांकडून विरोध होण्यामागे आपल्या कथित मजबूत परिस्थितीत शेजाऱ्यांना आपल्या पंजाखाली ठेवण्याचा केलेला प्रयत्न आहे. इंडो–पॅसिफिक क्षेत्रातील चीनचे वर्चस्व कमी करण्यासाठी चार देशांच्या क्वाड या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. या संघटनेच्या स्थापनेपासून इंडो–पॅसिफिक क्षेत्रातील चीनचा प्रभाव कमी होऊ शकेल, असे करार सातत्याने केले जात आहेत. बैठकीनंतर क्वाड नेत्यांच्या संयुक्त निवेदनात पूर्व आणि दक्षिण चीन समुद्रातील परिस्थितीवर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे की, आम्ही विवादित मुद्द्यांचे लष्करीकरण आणि दक्षिण चीन समुद्रात बळाचा वापर आणि धमक्यांबा गंभीर चिंता व्यक्त करत आहोत. सागरी वाद शांततेने आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार सोडवला जायला पाहिजे, असं आमचं मत आहे. हे घडत आहे त्यामागे अनेक वर्षांची चीनची कूट नीती आणि अप्पलपोटेपणा आहे. आपल्या आर्थिक बळावर आणि जागतिक क्षेत्रातील उत्पादनावर प्रभाव पाडण्याच्या क्षमतेवर अति आत्मविश्वास ठेवून सर्वांनाच चीन त्रासदायक ठरू लागला तेव्हा जगातील या देशांचे एकत्र येणे सुरू झाले. क्वाड' गट भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया यांच्या सामंजस्यपूर्ण सहकार्यासाठी महत्त्वपूर्ण मानला जातो.

# पोलीस अधिकाऱ्यासह तिघे एसीबीच्या जाळ्यात

## लाचखोरांनी ९० हजाराची स्वीकारली लाच

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** अकोला जिल्ह्याच्या बाळापूर पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान रिठे, न्यायालयीन लिपिक गोवर्धन कपले, व खाजगी व्यक्ती सदानंद कांबेकर, असे तिघांना २४ सप्टेंबर रोजीच्या दुपारी ९० हजाराची लाच स्वीकारताना अकोला लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडून अटक केली आहे.




बाळापुर ठाण्यात फसवणुकीचा प्रकरण प्रलंबित होता. या प्रकरणात फिर्यादीने मदतीसाठी पोलिसांशी संपर्क साधला होता. परंतु सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान रिठे यांनी तपासात सहकार्य करण्याचे सांगून दोन साथीदाराच्या मदतीने दीड लाख रुपयांची मागणी केली, तडजोडी नंतर ९० हजार रुपये देण्याचे ठरले, एसीबीने या सर्व प्रकरणाची पडताळणी केली आणि ९० हजार रुपयांची लाच स्वीकारताना सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान रिठे, न्यायालयीन लिपिक गोवर्धन कपले, व खाजगी व्यक्ती सदानंद कांबेकर असे तिघे लाचखोरांना रंगेहात पकडून अटक केली असून, वृत्तलेपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

### या अधिकाऱ्यांनी केली कारवाई

अकोला लाचलुचपत विभागाचे पोलीस उपअधीक्षक मिलिंद बहाकर यांच्या मार्गदर्शनात राहुल इंगळे, संदीप ताले, दिगंबर जाधव, किशोर पवार, यांनी सापळा रचवून सहाय्यक पोलीस निरीक्षक, न्यायालयीन लिपिक, व खाजगी इसम, असे तिघे लाचखोरांना अटक करून कारवाई केली आहे.

### पोलीस विभागात उडाली एकच खडबड

२४ सप्टेंबर रोजीच्या दुपारी पोलीस अधिकाऱ्याचा तिघांना ९० हजाराची लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाने अटक केल्याची माहिती जिल्हाभरात पसरताच पोलीस विभागात एकच खडबड उडाली होती.

# मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांच्या विरोधात प्रिया दत्त रिंगणात?

## विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस मोठी खेळी करणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाविकास आघाडीच्या जागा वाटपाची चर्चा येत्या १० दिवसांमध्ये पूर्ण होईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं आहे. मुंबईतील विधानसभेच्या ३६ जागांबाबत देखील महाविकास आघाडीचा निर्णय अद्याप समोर आलेला नाही. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीनं मुंबईतील ६ पैकी ४ जागा जिंकत महायुतीला धक्का दिला होता. मुंबई उत्तर मध्य लोकसा मतदारसंघात काँग्रेस नेत्या वर्षा गायकवाड यांनी भाजपच्या उज्वल निकम यांना पराभूत केलं होतं. याच मतदारसंघात वांद्रे पश्चिम आणि वांद्रे पूर्व हे दोन मतदारसंघ येतात. यापैकी वांद्रे पश्चिममध्ये काँग्रेसकडून माजी खासदार प्रिया दत्त यांना उमेवारी दिली जाण्याची शक्यता आहे. सध्या वांद्रे पश्चिमचे विद्यमान आमदार आशिष शेलार आहेत. आशिष शेलार विरुद्ध प्रिया



दत्त अशी निवडणूक होणार का हे जागावाटप झाल्यानंत स्पष्ट होईल.

प्रिया दत्त यांना वांद्रे पश्चिम विधानसभा मतदारसंघातून उमदवारी देण्याबाबत काँग्रेसचा विचार आहे. प्रिया दत्त या काँग्रेसच्या माजी खासदार आहेत. प्रिया दत्त यांचा या मतदारसंघात प्रभाव असल्याचं पाहायला मिळतं. प्रिया दत्त यांना उमेदवारी जिंकवून ही जागा जिंकण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. दुसरीकडे काँग्रेसला वांद्रे पश्चिम मतदारसंघ दिल्यास वांद्रे पूर्वची जागा शिवसेना ठाकरे गटाला द्यावी लागण्याची शक्यता आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेत्या वर्षा गायकवाड विजयी झाल्या होत्या. वर्षा गायकवाड यांना या मतदारसंघातून चांगली मतं मिळाली होती. मात्र, भाजपच्या उज्वल निकम यांना वांद्रे पश्चिम मतदारसंघातून आघाडी मिळाली होती. उज्वल निकम यांना या मतदारसंघात मिळालेली आघाडी ही फार मोठी नव्हती. उज्वल निकम यांना ७२५९३ मतं मिळाली तर वर्षा गायकवाड यांना ६९ हजारांपेक्षा अधिक मितं मिळाली होती. त्यामुळं काँग्रेसच्या या विधानसभा मतदारसंघात यश मिळण्याबाबतच्या आशा वाढलेल्या आहेत. लोकसभेचा कल पाहता आशिष शेलार आणि प्रिया दत्त यांच्यात जोरदार लढत होऊ शकते.

वांद्रे पूर्व जागेवर गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे झिशान सिद्दीकी विजयी झाले होते. आता, झिशान सिद्दीकी यांनी काँग्रेसची साथ सोडली आहे. झिशान सिद्दीकी यांनी शिवसेना उमेदवाराचा पराभव करत विजय मिळला होता. आता राज्यात महाविकास आघाडीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि काँग्रेस एकत्र आहेत. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत वर्षा गायकवाड यांना यावेळी मोठी आघाडी मिळाली होती. त्या पार्श्वभूमीवर मविआला ही जागा जिंकण्याची आशा आहे. मात्र, वांद्रे पूर्वची जागा विधानसभेला आपल्या पक्षाला मिळावी यासाठी ठाकरेंच्या शिवसेनेचे प्रयत्न सुरु आहेत.

पान १ वरून...

## भाजपाच्या मेळाव्यासाठी अमित शाह राज्यात

संघाचा आढावा घेतला जाणार आहे. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे राज्य प्रभारी भूपेंद्र यादव, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाला जवळपास ९०० पदाधिकाऱ्यांची हजेरी असणार आहे. त्यानंतर गृहमंत्री अमित शाह शहरातच मुक्कामी असणार असून हॉटेल रामा इथं काही खासगी बैठका घेणार आहेत. त्यानंतर २५ सप्टेंबर रोजी सकाळी वेरूळ इथल्या घृष्णेश्वर मंदिर दर्शन घेऊन ते नाशिककडं रवाना होतील, अशी माहिती भाजपा तर्फे देण्यात आली आहे.

एकनाथ शिंदे – अजित पवार येणार शहरात : गृहमंत्री अमित शाह मंगळवारी नागपूर इथं कार्यक्रमला हजेरी लावतील. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर इथं भाजपाच्या मेळाव्यासाठी ते हजर राहतील. मात्र त्याचवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील शहरात येणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रात्री साडेआठ वाजता विमानानं शहरात दाखल होणार आहेत. तर दोन तास हॉटेल रामा इथं त्यांची वेळ राखीव असून त्यानंतर ते पुन्हा मुंबईकडं रवाना होणार आहेत. दुसरीकडं त्याचवेळी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार हे देखील शहरात येणार आहेत. सायंकाळी राष्ट्रवादी मेळाव्याला ते हजेरी लावतील, नंतर हॉटेल रामा इथं ते देखील येणार आहेत. त्यामुळे गृहमंत्री अमित शाह यांचा हॉटेलमधील असलेला राखीव वेळ आणि त्याच दरम्यान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांचाही त्याच ठिकाणी असलेला राखीव वेळ यामुळे, तिथं राज्यातील आगामी निवडणुकीच्या अनुषंगानं महत्त्वाची गुप्त बैठक होणार असल्याची चर्चा आहे.

# शेतकऱ्यांनी रक्ताने लिहिलेले पत्र फाडल्याबद्दल गृहमंत्र्यांनी माफी मागावी

## ■ सावरगाव येथे काँग्रेस पदाधिकाऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन
## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन







दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्या निकाली काढाव्यासाठी दि.१९ सप्टेंबर रोजी शेतकऱ्यांनी रक्ताने लिहलेले निवेदन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना देऊन देता ते दडपशाही करून फाडल्याबदल गृहमंत्र्यांनी माफी मागावी व दडपशाही करणाऱ्या अधिकार्यांवर कार्यवाही करावी,या मागणीसाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष्य तथा माजी आ. राहुल बोंद्रे यांच्या नेतृत्वात सावरगांव डुकरे येथे दि.२३ सप्टेंबरपासून अन्नत्याग आंदोलन सुरु केले आहे.या आंदोलनाता महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांनी पाठिंबा दिला आहे.

बुलढाणा येथे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुखमंत्री हे दि.१९ सप्टेंबर रोजी आले असता शेतमालाला हमी भाव द्यावा, शेतकऱ्याची कर्जमाफी करावी, शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम द्यावी,आदींसह मागण्या निकाली काढण्यासाठी चिखली येथे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. राहुल बोंद्रे यांच्या नेतृत्वात शेतकयांचा मोर्चा काढण्यात आला होता. तसेच त्याच दिवशी मुख्यमंत्री यांना शेतकऱ्यानी रक्ताने लिहिलेल्या निवेदन देऊन शेतकर्यांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी मुख्यमंत्री यांना रक्ताने लिहिलेले निवेदन देण्यासाठी सबंधित अधिकार्यांची परवानगी मागितली.मात्र सदर परवानगी नाकारण्यात आली.

तेव्हा मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री हे कार्यक्रम स्थळी जात असताना त्यांना निवेदन देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी कार्यकर्यांसह केला असता राज्यशासनाने पोलिस प्रशासनाच्या बळावर दडपशाही केली व निवेदन फाडून टाकले, मुख्यमंत्री सदर निवेदन पोहचू दिले नाही. त्यामुळे या सरकाने शेतकर्यांची ही थट्टा केली असून गृहमंत्र्यांनी शेतकर्यांची माफी मागावी व संबंधीत दोषी अधिकार्यांवर निलंबनाची कारवाई करावी,या मागणीसाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. राहुल बोंद्रे यांनी दि.२३ सप्टेंबर २०२४ रोजी सावरगाव डुकरे या गावी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. या अन्नत्याग आंदोलनास मेहकर विधानसभा येथील सर्व महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षानी पाठिंबा देत तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

निवेदनावर श्याम उमाळकर, लक्ष्मण घुमरे, भास्करराव काळे, अनंतराव वानखेडे, आशिष रहाटे सिद्धार्थ खरात, नंदू बोरे,नाजीमभाई कुरेशी, संपतराव देशमुख, देवानंद पवार, दत्ता घनवट, निंबाजी पांडव, किशोर गारोळे, विनायक टाले, पंकज हजारी, अॅड्.विजय मोरे, आकाश घोडे, , शैलेश बावस्कर, डॉ. शेषराव बदर, अनिल देशमुख, भूषण संजय काळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### सरकारावर शेतकऱ्यांची नाराजी

शेतकऱ्यांच्या मागण्या निकाली काढण्यासाठी रक्ताने लिहिलेले निवेदन न स्वीकारता राज्य सरकारने पोलिस प्रशासनाला हाताशी धरून फाडल्याबद्दल शेतकऱ्यांमध्ये महायुती सरकारबद्दल प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### धनगर समाजाचे १६ व्या दिवशी समाजाच्या आग्रहाखातर सहा उपोषणकर्त्यांनी सोडले



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** :पंढरपुरातील धनगर समाजाचे आरक्षणासाठी सुरू असलेल उपोषण आज १६ व्या दिवशी समाजाच्या आग्रहाखातर सहा उपोषणकर्त्यांनी सोडले आहे. यानंतर उद्या छत्रपती संभाजी नगर येथील जात पडताळणी कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्याचा निर्धार त्यांनी केला.

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळावं यासाठी पंढरपूर मध्ये दीपक बोराडे, यशवंत गायके, माऊली हळनवर, योगेश धरम, गणेश केसकर, विजय तमनर या सहा उपोषणकर्त्यांनी १६ दिवस उपोषण केलं. शासनाने खिलारे कुटुंबाचे जात पडताळणी प्रमाणपत्र रद्द करण्यास मान्यता दिली आहे. मात्र त्यास विलंब होत आहे. त्यामुळे हजारो धनगर बांधवांसह सहाही उपोषणकर्ते उद्या जात पडताळणी कार्यालय छत्रपती संभाजी नगर समोर ठिय्या आंदोलन करणार आहेत.

### स्वच्छता ही सेवा मोहीमेंतर्गत एपीएमसी बाजारपेठेत राबविण्यात आली स्वच्छता मोहीम




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता ही सेवा मोहीमेंतर्गत आशिया खंडातील सर्वात मोठी बाजारपेठ असणाऱ्या एपीएमसी मार्केटमध्ये मेगा क्लिनींग ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. एपीएमसीच्या पाचही बाजार समित्यामध्ये ही मेगा क्लीनिंग ड्राइव्ह राबविण्यात आली. यामध्ये मनापाचे सफाई कर्मचारी, एनएसएसचे विद्यार्थी, व्यापारी आणि माथाडी वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. कांदा बटाटा मार्केट मधून या स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली असून सर्व मार्केट परिसर स्वच्छ करण्याचे उद्देश्य या मोहिमेच्या माध्यमातून साध्य करण्यात आले आहे.

### पुरी भाजीच्या बिलावरुन झालेल्या वादातून हत्या; आरोपीला पोलिसांनी केली अटक

दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** : पनवेल ओरियन मॉलच्या मागच्या बाजूला असलेल्या गोडाऊन मध्ये एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पाच दिवसांपूर्वी पोलिसांना आढळून आला.



मृतदेहाची ओळख अजूनही पटलेली नाही. तर प्रथम दर्शनी ही हत्या असल्याचे आढळून आले होते. पोलिसांच्या तपासात एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यात मयत व्यक्तीसोबत एक व्यक्ती जाताना आढळला, पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यानेच त्याला दोरीच्या सहाय्याने गळा आवळून मारल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीने हत्येची कबुली दिली, आरोपीच्या सांगण्यावरून त्यांची ओळख घटनेच्या दोन दिवस आधीच झाली होती. घटनेच्या दिवशी दोघेही एका बार मधून दारू पिऊन बाहेर आले, चालत असताना एका फुटपाथवर पुरी भाजीचा स्टॉलवर दोघांनी पुरी भाजी खाल्ली, मात्र बिल कोण देणार यावरून त्यांच्यात वाद झाला, शेवटी मयत व्यक्तीने बील भरले, मात्र वाद सुरूच राहिला. दोघेही ओरियन मॉलच्या मागे बाजूस गेले तिथेही वाद थांबला नाही आणि आरोपी धीरज राजू वर्मा याने मयत व्यक्तीची दोरीने गळा आवळून हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी धीरज वर्मा याला अटक करून पोलीस कोठडी सुनावली असून याप्रकरणी अधिक तपास गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस करत आहेत.

### असाच नाही शुभमन गिल-ऋषभ पंतने बांगलादेश विरुद्ध पाडला धावांचा पाऊस, या खास गुणामुळे मिळाले यश

चेन्नई : चेन्नई कसोटीत टीम इंडियाच्या बांगलादेशविरुद्धच्या विजयाचा नायक स्टार अष्टपैलू रविचंद्रन अश्विन होता, ज्याने आपल्या घरच्या मैदानावर पहिल्या डावात शतक झळकावले आणि दुसऱ्या डावात ६ बळी घेतले. मात्र त्याच्याशिवाय काही खेळाडूंची कामगिरीही या विजयात महत्त्वाची ठरली, त्यात शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांचाही समावेश आहे. दोन्ही फलंदाजांनी उत्कृष्ट शतके झळकावली आणि शानदार भागीदारी केली. या भागीदारीमुळे टीम इंडियाचे दुसऱ्या डावात पुनरागमन झाले. या दोघांच्या कठोर परिश्रमांशिवाय, त्यांचा कठोर सराव आणि परस्पर समज यांचाही या भागीदारीत मोठा वाटा होता, ज्यामुळे मैदानाबाहेर चांगले संबंध निर्माण झाले.बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी गिल आणि पंत यांनी दीर्घ भागीदारी केली. दोन्ही फलंदाजांनी मिळून भारताच्या दुसऱ्या डावात १६७ धावा जोडल्या, ज्यामुळे बांगलादेशला सामन्यातून बाहेर काढले. यादरम्यान पंतने सहावे कसोटी शतक झळकावले. त्यानंतर लगेचच बाद झाल्यानंतर गिलनेही पाचव्यांदा कसोटी क्रिकेटमध्ये शतकाचा टप्पा ओलांडला.

# केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे संतप्त; खडसे यांनी पंचायत समितीला ठोकळे टाळे


दैनिक आपला विदर्भ

**मुक्ताईनगर/प्रतिनिधी** : मुक्ताईनगर पंचायत समितीतील अधिकाऱ्याविरोधात तालुक्यातील अनेक नागरिकांनी केंद्रीय राज्यामध्ये रक्षा खडसे यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. तर मुक्ताईनगर पंचायत समितीमध्ये आज दि.२४ सप्टेंबर रोजी मीटिंग आयोजित करण्यात आली होती. या मिटींगला केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे यांनी उपस्थिती लावून अधिकाऱ्यांना जाब विचारला असतं अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तर दिले. त्यामुळे खडसे संतप्त होत त्यांनी मुक्ताईनगर पंचायत समितीला टाळे ठोकले. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी अधिकाऱ्याने विरोधात घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे



तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात मात्र एकच खळबळ उडाली आहे.

मुक्ताईनगर तालुक्यातील शेकडो नागरिकांनी पंचायत समिती मध्ये कोणतेही काम सुरळीत होत नाही नागरिकांना नाहक त्रास दिल्या जातो वारंवार चक्रा माराव्या लागत आहेत त्यामुळे तालुक्यातील नागरिक त्रस्त झाले असून आपण याकडे लक्ष घालावे अशा मुक्ताईनगर पंचायत समिती मधील अधिकाऱ्यांच्या विरोधात केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्याकडे गाऱ्हाणी मांडून न्याय देण्याची मागणी केली होती. योगायोगाने मुक्ताईनगर पंचायत समिती ची दिनांक २४



सप्टेंबर रोजी मीटिंग होती या मिटींगमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सहभाग घेत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत जाब विचारला असता यावेळी अधिकाऱ्यांनी उडवा उडवी चे उत्तरे देत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. अधिकाऱ्यांना केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी विचारलेल्या प्रश्नाला योग्य उत्तर न देता आल्याने रक्षा खडसे यांनी आक्रमक भूमिका घेत चक्क मुक्ताईनगर पंचायत समितीच्या कार्यालयालाच टाळे रक्षा खडसे यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे मात्र तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातील कामचुकार अधिकाऱ्यांमध्ये मात्र एकच धांदल उडाली. यावेळी रक्षा खडसे यांनी नागरिकांचे कोणतेही कामे रोखून त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न केल्यास यापुढे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा काम चुकार अधिकाऱ्यांना देत प्रलंबित कामे तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश दिले

# सलमान खानसाठी सिकंदर हिट होणे का आहे महत्त्वाचे?


दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सलमान खानच्या आगामी 'सिकंदर' या चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. जो पुढच्या वर्षी म्हणजेच २०२५ च्या ईदला रिलीज होणार आहे. सलमान खाननेही या चित्रपटावर पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. प्रत्येक गोष्टीवर तो स्वत: काम करत आहे. याच कारणामुळे सलमान खान चेन्नईला जाऊन ?क्शन सीनचे ट्रेनिंग घेत होता. या चित्रपटात सलमान खानसोबत रश्मिका मंदान्ना दिसणार आहे. सध्या मुंबईत चित्रपटाच्या दुसऱ्या शेड्यूलवर काम सुरू असून, त्यासाठी मोठा सेट तयार करण्यात आला आहे. सलमान खानलाही या चित्रपटाकडून आशा आहेत. एआर मुरुगादास हे चित्रपट दिग्दर्शित करत आहेत, तर साजिद नाडियादवाला निर्मिती करत आहेत.

सलमान खान ईद २०२५ साठी जोरदार तयारी करत आहे. पण हा चित्रपट हिट होणे हे भाईजानसाठी अनेक अर्थाने महत्त्वाचे आहे. प्रथम, हा आधीच खूप मोठे बजेट चित्रपट आहे. ४०० कोटींच्या बजेटमध्ये तयार होत असलेल्या या चित्रपटासाठी सलमान खानच्याही वेगवेगळ्या योजना आहेत, ज्या त्याच्या आगामी चित्रपटांमध्ये दिसणार आहेत. चित्रपटाने बजेटपेक्षा कमी व्यवसाय केला, तरी सलमान खानच्या स्टारडमवर त्याचा परिणाम होणार नाही. पण आगामी चित्रपट आणि त्याची योजना धोक्यात येऊ शकते. कसे ते ? जाणून घेऊया.

जगभरात बॉलिवूडचा भाईजान सलमान खानच्या चाहत्यांची कमी नाही. चाहते त्याच्या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. एक-दोन फ्लॉप चित्रपटांचा त्याच्या करिअरवर काहीही परिणाम होऊ शकत नाही. त्याने बॅक टू बॅक ५-६ फ्लॉप दिले, तरी निर्माते त्याच्यावर पैसे गुंतवत राहतील. पण त्याच्याबद्दल चाहत्यांमध्ये निर्माण झालेले वातावरण अजून थंडावणार आहे. जसे अक्षय कुमार सोबत घडत आहे. लोकांच्या हृदयात आणि मनात स्थान न मिळाल्याचा तोटा म्हणजे सलमान खानच्या आगामी चित्रपटांना त्यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही.

## नवरात्री निमित्त मुंबईतील भुलेश्वर मार्केटमध्ये स्वस्त दरात आकर्षक घागरा चोळी दाखल



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : सध्या बाजारात नवरात्र उत्सवाची लगबग सुरू झाली आहे. यावर्षी नवरात्रौत्स ३ ऑक्टोबर पासून सुरू होणार आहे. महाराष्ट्रातही विविध भागांमध्ये नवरात्री दरम्यान देवीच्या विविध रुपांची पूजा केली जाते. यावेळी गरबा खेळला जातो. दरम्यान तरुण-तरुणी आणि लहान मुलं सुद्धा खास पारंपरिक कपडे परिधान करतात. तरुणी घागरा- चोळी, तर तरुण धोती-कुर्ता परिधान करुन गरबा खेळण्याचा आनंद घेतात. यात तरुणींसाठी चनिया (घागरा) चोळीचा नवा ट्रेंड दरवर्षी बाजारात पाहायला मिळतो आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा भुलेश्र्वर मार्केट मध्ये ट्रेंडिंग व अनोखे डिझाईन असलेल्या घागरा-चोळी आणि मुलांसाठी धोती- कुर्ता उपलब्ध आहेत. मोठ्यांपासून लहान मुलांपर्यंतचे जॅकेट महिला व लहान मुलांचे चनिया चोळी, स्कर्ट, धोती, कुर्ती, ब्लाऊज, दुपट्टा असे विविध कपडे कमी दरात मिळतात तर महिला चनिया चोळीच्या स्वतः चे सेट तयार करण्यासाठी वेगळे स्कर्ट,घागरा, ब्लाऊज दुपट्टा, घेऊन स्वतःचे सेट तयार करता येतात.

तसेच लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंतचे धोती- कुर्ता सुद्धा भुलेश्र्वर मार्केट मध्ये वेगळ्या डिझाईन मध्ये उपलब्ध आहेत. त्याचबरोब टोपी मध्ये तीन प्रकार आहेत काश्मिरी टोपी, नेपाळी टोपी, आणि गुजराती लोक परिधान करतात तशी गोल टोपी त्याला राऊंड टोपी असे म्हणतात. तसेच दुपट्ट्यामध्ये सुद्धा वेगवेगळे प्रकार आहेत जसे की कॉटन दुपट्टा, बांधणी दुपट्टा असे ट्रेंडिंग दुपट्टे सुद्धा भुलेश्र्वर मार्केट मध्ये उपलब्ध आहेत.

# विविध शासकीय विभाग जिल्हा परिषद शाळेत झरी जामणी आकांक्षित तालुक्यात अनोखा उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : निती आयोगाच्यावतीने आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमात झरी जामणी तालुक्याचा समावेश आहे. कार्यक्रमांतर्गत 'विविध शासकीय विभाग जिल्हा परिषद शाळेत' हा अनोखा उपक्रम तालुक्यात राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत विविध विभागांचे गावस्तरावरील शासकीय कर्मचारी एकत्र येऊन जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या विभागाचे गाव स्तरावरील कार्य, जबाबदाऱ्या आणि सद्यस्थितीत सुरू असलेले विविध उपक्रम आणि योजना याबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन करत आहेत. यामध्ये विविध विभागाचे कर्मचारी एकत्र येऊन समन्वयाने जवाबदारी पार पाडत आहेत.

असा अनोखा उपक्रम राबविणारा झरी जामणी हा



देशातील पहिलाच तालुका आहे. या उपक्रमांतर्गत शासनाचे विविध ११ पेक्षा जास्त विभाग एकत्र येऊन प्रभावीरित्या विद्यार्थ्यांद्वारे नागरिकांमध्ये शासकीय योजना, उपक्रम आणि निती आयोगाच्या आकांक्षित तालुका कार्यक्रमातील विभाग निहाय दर्शकांची जनजागृती केली जात आहे.

हा उपक्रम सर्व गावांमध्ये राबविण्यात येत असून त्यामध्ये गाव पातळीवरील कोतवाल, ग्रामसेवक, तलाठी, पशुधन पर्यवेक्षक, पशु सखी, कृषी सहायक, कृषी सखी, महिला बचत गटांचे सदस्य, पोलिस, पोलिस पाटील, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस, आशा, एएनएम, जलसुरक्षक, स्वच्छता दुत, रोजगार सेवक, आरोग्य सेवक, शिक्षक, वनसंरक्षक, संगणक परिचालक, वीज पुरवठा कर्मचारी हे सहभागी होऊन विद्यार्थ्यांना अगदी सोप्या भाषेत त्यांच्या विभागांचे गाव स्तरावरील कार्य, जबाबदारी आणि चालू योजना, उपक्रम याबद्दल माहितीपर मार्गदर्शन करत आहेत.

हा उपक्रम झरी अधिकारी रविंद्र कुमार सांगळे यांच्या कल्पनेतून साकारता असून यासाठी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की आणि केळापुरचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुहास गाडे केळापूर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी होत आहे. झरीचे तहसीलदार अक्षय रासने, तालुका कृषी अधिकारी अमोल आमले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मोहन गेडाम, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रभाकर पांडे, पशुसंवर्धन अधिकारी झेड.जे.जाधव, उमेदचे तालुका मिशन मॅनेजर प्रदीप राठोड आणि आकांक्षित तालुका कार्यक्रम फेलो अनिल नरवाडे हे या उपक्रमाच्या उत्कृष्टपणे अंमलबजावणी प्रयत्न करत आहे.

### नोकरीत बढती करण्याकरिता रेल्वे कर्मचाऱ्यानं रचला भयानक कट, पोलिसही चक्रावले!

सूरत : नुकताच सुरत जिल्ह्यातील किम स्टेशनजवळ रेल्वे रुळावरून घसरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ त्याचा तपास सुरू करण्यात आला. मात्र, पोलिसांच्या तपासादरम्यान रेल्वे कर्मचाऱ्यांनीच रेल्वे घसरविण्याचा कट रचल्याचं उघड झालंय. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिलीय.२१ सप्टेंबर रोजी किम स्टेशनजवळ ट्रॅकवरून फिशप्लेट काढून ट्रेन रुळावरून घसरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. तपासात समोर आलं की, त्यावेळी गस्तीवर असलेल्या आरोपी सुभाष पोद्दारला नोकरीत लवकर बढती मिळवायची होती. त्यामुळं त्यानं हा कट रचला.

# किनगाव राजा येथील महसूल मंडळामध्ये प्रजन्यमापक यंत्रणा पडली धुळखात

दैनिक आपला विदर्भ

**किनगाव राजा/प्रतिनिधी** : किनगाव राजा येथे प्रजन्यमापक यंत्रणा येथे असून ती यंत्रणा पूर्णपणे धुळखात पडली आहे या यंत्रणेमार्फत या मंडळामध्ये किती मिलिमीटर पाऊस पडला याची नोंद होत असते पण अक्षरशा या पर्जन्यमापक यंत्रणेमुळे शेतकऱ्याला पिक विमा व राज्य सरकार केंद्र सरकार यांच्याकडून आर्थिक मदतीसाठी या यंत्रणेचा वापर केला जात आहे पण या यंत्रणेची आज रोजी अशी अवस्था आहे की ती पूर्णपणे धुळखात पडली असून त्या ठिकाणी पूर्णपणे त्या यंत्रणेची वायरिंग आणि अँटेना पूर्णपणे बाजूला पडल्यामुळे त्याचा उपयोग होत नाही कारण यावेळी दिनांक २१ सप्टेंबर रोजी या किनगाव राजा परिसरामध्ये कुठेच पाऊस पडलेला नसून २२ सप्टेंबर रोजी





३.५ मिलिमीटर पाऊस पडला असल्याची रेनफॉल रिपोर्ट मध्ये नोंद करण्यात आली आणि २२ सप्टेंबर रोजी ०.३ मिली पाऊस पडल्याची नोंद सुद्धा करण्यात आली ही नोंद करण्याचे एकमेव उद्देश २१ दिवसाचं पावसाचं खंडन जर पडलं तर शेतकऱ्याला सरसकट या मंडळात पिक विमा द्यावा लागतो म्हणून चुकीचा रेनफोल रिपोर्ट या ठिकाणी बनवण्यात आला पण २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी चार ते पाच या दरम्यान या परिसरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी सारखा पाऊस पडला असताना सुद्धा या परिसरामध्ये ०.० मिली पावसाची नोंद रेन फॉल रिपोर्ट मध्ये करण्यात आली त्यामुळे येथील पर्जन्यमापक यंत्रणा पूर्ण नादुरुस्त आहे ही माहिती शेतकरी योद्धा कृती समितीचे समन्वयक श्री बालाजी सोसे यांना जेव्हा कळाली तेव्हा त्यांनी तालुका कृषी अधिकारी श्री पांचाळ साहेब यांना लगेच माहिती देऊन त्यांनी स्पॉट पंचनामा करण्याची विनंती केली आणि तालुका कृषी अधिकारी यांनी किनगाव राजा येथे पर्जन्यमापक यंत्रणेची पाहणी आणि संबंधित विभागाला फोनवरून आणि स्पॉट पंचनामा करून ताबडतोब चौकशी करण्याचे दिले आदेश प्रजन्यमापक यंत्रणेचे इंजिनियर श्री मस्के साहेब त्या ठिकाणी तात्काळ त्या पर्जन्यमापक यंत्रणेला भेट देऊन त्यांनी ही मशीन नादुरुस्त असल्याचे त्या ठिकाणी सांगितले म्हणून शेतकऱ्याची फसवणूक होत आहे ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरला आहे आणि त्या शेतकऱ्यांना पिक विम्याची ऑनलाइन तक्रार करण्यासाठी या रेन्फॉल रिपोर्टचा त्या ठिकाणी उपयोग केला जातो आणि त्या ठिकाणी ते रेन फॉल रिपोर्ट ०.० मिळाल्यामुळे येथील नुकसान होऊन सुद्धा या शेतकऱ्याला मदत मिळणार नाही म्हणून राज्य सरकारने याकडे लक्ष देऊन ठिकाणचे पर्जन्यमापक यंत्रणा लवकरात लवकर चालू करावी आणि या किनगाव राजा महसूल मंडळांमधील शेतकऱ्यांना कुठले निकष न लावता या परिसरातील सरसकट सोयाबीन व इतर पिकाला पिक विमा ऑनलाइन तक्रार करते वेळेस कुठलेही निकष न लावता ती तक्रार ग्राह्य धरावी जेणेकरून शेतकऱ्याला पिक विमा मिळेल अशी मागणी येथील शेतकरी योद्धा कृती समितीचे समन्वयक श्री बालाजी सोसे यांनी केली आहे त्यावेळी उपस्थित देवानंद सोसे , निलेश देशमुख, नितीन सानप शिवानंद पालवे ,कैलास हरकळ शिंगणे सर ,सतीश वायाळ ,दीपक पडोळकर, मधुकरराव साळवे ,रमेश सानप व इतर शेतकरी उपस्थित होते

## विविध वृत्त...


### सावरगाव डुकरे येथे सुरु असणाऱ्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ शेगावात काँग्रेसचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : सावरगाव डुकरे येथे काँग्रेसकडून सुरू असणाऱ्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा म्हणून आज बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे आंदोलन करण्यात आले. काँग्रेस पक्षाचे राज्य सचिव रामविजय बुरुंगले आणि पक्षनेत्या स्वाती वाकेकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली विधानसभा मतदारसंघातील तीन हजार शेतकऱ्यांच्या मागण्यांचे रक्ताने लिहिलेले निवेदन घेऊन १९ सप्टेंबरला बुलढाणा येथे मुख्यमंत्र्यांना देण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे त्याठिकाणी आले असता पोलिस प्रशासनाकडून त्यांची अडवणूक करण्यात आली. जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या रक्ताचे निवदने हिसकावून जिल्हा पोलीस प्रशासनाने फाडले. यासाठी राहुल बोंद्रे हे आदर्श गाव सावरगाव डुकरे येथे सोमवारपासून अन्न त्याग आंदोलनाला बसले आहेत. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून आज शेगावात काँग्रेसकडून निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी महायुती सरकार आणि बुलढाणा पोलिसांच्या विरोधात नारेबाजी करीत निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

### बुलढाणा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटर वाहन विभाग कर्मचाऱ्यांनी पुकारला संप



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : अनेक वर्षाच्या आपल्या प्रलंबित विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बुलढाणा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे ६६ वर्ष नेतृत्व करणाऱ्या मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेने आजपासून बेमुदत संपावर गेले आहेत. आरटीओ कार्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय कामकाजाबरोबर वाहन चालक, मालक हे ग्राहक सेवेचे काम करावे लागते. यामुळे प्रशासकीय कामात गुंतागुंत निर्माण झाली आहे. या दुहेरी कामांच्या बोजामुळे कर्मचारी त्रस्त आहेत तसेच महसुली विभागीय बदल्यांचे धोरण रद्द करण्यात आलेले नाही, विभागीय परीक्षांमध्ये अनावश्यक बदल करण्यात आले आहेत, आकृतीबंधाची योग्य अंमलबजावणी केली जात नाही, कर्मचाऱ्यांच्या हिताच्या कळसकर समितीच्या तरतुदींची अंमलबजावणी न करणे, बदल्या, बढत्यांमध्ये सेवा ज्येष्ठतेचा विचार न करणे या मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. जोपर्यंत लेखी स्वरुपात मागण्या मान्य झाल्याचे पत्र परिवहन विभागाकडून दिले जात नाही, तोपर्यंत बेमुदत बंद मागे घेतला जाणार नाही असे मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष गजानन तनपुरे यांनी सांगितले आहे.

### का वाढवावे लागले देवराच्या तिकिटाचे दर ?

**मुंबई/प्रतिनिधी** : ज्युनियर एनटीआरचा देवरा हा चित्रपट २७ सप्टेंबर रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे. हा चित्रपट दोन भागात येणार आहे. या चित्रपटात ज्युनियर एनटीआरसोबत जान्हवी कपूर मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेत आहे. चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. NTR ६ वर्षानंतर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करत आहे, ज्याबद्दल त्याचे चाहते खूप उत्सुक आहेत. हा उत्साह पाहता या चित्रपटाच्या तिकीट दरात वाढ करण्याची मागणी करण्यात आली होती, ज्याला आता तेलंगणा सरकारने मान्यता दिली आहे. यासोबतच चित्रपटाच्या एक्स्ट्रा शोच्या वेळेलाही म ान्यता देण्यात आली आहे.

कोरताला शिवा दिग्दर्शित देवरा: भाग १ मध्ये सैफ अली खानदेखील आहे. तेलंगणामध्ये शो तिकिटाच्या दरात १०० रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. ज्युनियर एनटीआरच्या या चित्रपटाबाबत लोकांमध्ये वेगळीच क्रेझ आहे. चित्रपटाच्या रिलीजच्या दिवशी, त्याचा पहिला शो रात्री १ वाजता सुरू होईल, जो २९ चित्रपटगृहांमध्ये दाखवला जाईल. तसेच त्यांची तिकिटे वाढीव किमतीत उपलब्ध असतील. याशिवाय पहिल्या दिवशी पहाटे चार वाजल्यापासून तेलंगणात देवराचे सहा शो होतील. रिलीजच्या पुढील नऊ दिवसांसाठी म्हणजे २८ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर, देवरा तेलंगणात दररोज पाच शो होतील. यामध्येही तिकीट दरात किंचित वाढ होणार आहे, ज्यामध्ये मल्टिप्लेक्समध्ये ५० रुपये आणि सिंगल स्क्रीन थिएटरमध्ये २५ रुपयांची वाढ होणार आहे.

आंध्र प्रदेशातील शोची मागणी लक्षात घेऊन सरकारने तिकिटांचे दर जास्त असूनही वाढवण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये वरच्या वर्गाच्या तिकिटात ११० रुपयांनी, खालच्या वर्गाच्या तिकिटात ६० रुपयांनी आणि देवरा: भाग १ च्या मल्टिप्लेक्सच्या तिकिटात १३५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. रिलीजच्या दिवशी देवरा: भाग १ चे स्पेशल स्क्रिनिंग होईल, जे मध्यरात्री होईल. स्पेशल स्क्रिनिंगमध्ये सहा शो असतील. मात्र, दुसऱ्या दिवसापासून दररोज पाच शो आयोजित करण्यात आले आहेत.

भारतात देवराविषयीची लोकांची क्रेझ स्पष्टपणे पाहायला मिळते, पण अमेरिकेतही या चित्रपटाने खळबळ उडवून दिली आहे.

# ऋषांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांना आदर्श दाम्पत्य पुरस्कार

## चव्हाण दाम्पत्यावर होतोय अभिनंदनाचा वर्षाव : सहकार व वैद्यकीय क्षेत्रात दाम्पत्यांचे योगदान

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : महापुरुषांचे विचार अंगिकारुन करून सहजीवनाची वाटचाल करणार्या व आंतरजातीय विवाह करुन करून समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण करर्याबरोबरच सहकार व वैद्यकीय क्षेत्रात अनमोल योगदान देणार्या डोणगाव अर्बनचे अध्यक्ष ऋषांक चव्हाण आणि डॉ. ऋतुजाताई चव्हाण-गवई या दाम्पत्यांचा आदर्श दाम्पत्य म्हणून दि.२२ सप्टेंबर रोजी मेहकर येथील हॉटेल के.व्ही. प्राईड येथे गौरव करण्यात आला. समाजसुधारकांच्या स्वप्नातील समाजाच्या बांधणीसाठी या दाम्पत्यांनी पाऊल टाकत आपल्या कर्तृत्वाच्या बळावर सहकार व वैद्यकीय क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.**







### आदर्श दाम्पत्याचे राजकारणात पाऊल

महापुरुषांचे विचार अंगिकारुन करून सहजीवनाची वाटचाल करणार्या ऋषांक चव्हाण व डॉ. ऋतुजा चव्हाण यांनी सहकार व वैद्यकीय क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.या निस्वार्थ सामाजिक कार्याने त्यांचा मोठा चाहता वर्ग मेहकर मतदार संघात निर्माण झाला आहे. उच्चविद्याविभूषीत व सामाजिक कार्याची जाण असणार्या या आदर्श दाम्पत्याचे राजकारणाकडे वळलेले पाऊल हे नक्कीच मेहकर मतदार संघाचा चेहरामोहरा बदलणारा ठरेल. असा आशावाद सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त करीत त्यांच्याकडे तरुणतडफदार व सामाजिक कार्याची जाण असणारे व्यक्तीमत्व म्हणून पाहिले जात आहे.

ऋषांक चव्हाण हे तरुण तडफदार व्यक्तीमत्व म्हणून सर्वत्र परिचित असून त्यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान आहे. ग्राहकांना स्नेहपूर्ण तात्काळ सेवा देऊन त्यांनी सहकार क्षेत्रात वेगळेपण जपले आहे. डोणगाव अर्बन पतसंस्थेतील व्यवस्थापकासह सर्व कर्मचार्यांना आपलेसे करणारे व्यक्तीमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

आपल्या ताटातील अन्न हे सगळेच आपले नव्हे, तर त्यातील काही घास इतरांनाही द्यावेत, ही भावना कायम ऋषांक चव्हाण यांच्यामध्ये असल्याचे वेळोवेळी त्यांच्या सामाजिक कार्यावरून दिसून येत आहे. कमी वयामध्ये प्रगती करुन मोठा दृष्टिकोण ठेवत सर्वोत्तम कामं करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे ऋषांक चव्हाण यांना ओळखले जाते. त्यांच्या पत्नी ह्या एमबीबीएस डॉक्टर आहेत. उच्चविद्याविभूषित व सामाजिक कार्याची आवड त्यांना आहे. राजमाता जिजाऊ फाऊंडेशनच्या माध्यमातून त्या विविध सामाजिक कार्य करून अनेकांना मदतीचा हात देत उभे केले आहे.

या सामाजिक कार्याच्या बळावर या दाम्पत्यांकडे राजकीय क्षेत्रातील एक उमदे नेतृत्व म्हणून पाहिले जात आहे. या दाम्पत्यांच्या सकारात्मक विचारांचा आवाका प्रचंड आहे. त्यामुळेच जातपात-धर्माच्या पलीकडे जाऊन माणुसकीयुक्त आचरणावर त्यांनी भर दिला आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श दाम्पत्य पुरस्काराने जनस्वप्नपूर्ती परिवाराच्या वतीने दि.२२ सप्टेंबर रोजी मेहकरमधील हॉटेल के.व्ही. प्राईड येथे सेवा संकल्प प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ.नंदकुमार पालवे, डॉ. आरती पालवे, ॲड. पुरुषोत्तम खेडेकर, श्रीराम मल्टिहॉस्पीटलचे संचालक डॉ. हेमराज लाहोटी, उद्योजक अविनाश वतारी यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात आले आहे. स्मृतिचिन्हे, मानपत्र अन् शाल असे पुरस्काराचे स्वरुप होते. आदर्श दाम्पत्य पुरस्कार वितरण सोहळ्यात रिसोडच्या तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर,शिरपूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक रामेश्रवर चव्हाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता जे. एम. दांदडे, सुप्रसिद्ध व्यावसायिक उदय सावजी, शासकीय ठेकेदार रमेशराव काटे यांनाही आदर्श दाम्पत्य पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

## धुळे- सोलापूर महामार्गावर मराठा समाजाचा रास्तारोको

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** :जालना मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षण देण्यासह इतर मागण्या निकाली काढाव्या यासाठी गत आठ दिवसापासून उपोषण जालना जिल्ह्यातील अंतरावली सराटी येथे उपोषण सुरू केले आहे. त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली आहे. त्यामुळे मराठा समाज आता आक्रमक झाला आहे असून धुळे-सोलापूर महामार्गावर मराठा समाजाच्यावतीने दि. २४ सप्राटेंबर रोजी रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

मराठा समाज रस्त्यावर उतरला असून धुळे सोलापूर महामार्ग मराठा आंदोलकांनी अडवला होता. मराठा समाजाला आरक्षण द्यावे, या मागणीसाठी मराठा समाजाचे नेते मनोज जरागे पाटील हे अनेक वर्षापासून शासन दरबारी पाठपुरावा करीत आहेत.




तसेच आरक्षणासंदर्भात मराठा समाजावर दाखल झालेले गुन्ह मागे घेण्यात यावे इतर प्रलंबित मागण्या निकाली काढाव्या यासाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरंगे पाटील यांनी उपोषणाचा मार्ग पत्करला आहे.तसेच त्यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर सहभागीत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.तर शासनाच्या वतीने सुद्धा मराठा समाजाला आरक्षण देण्याची आश्र्वासन वारंवार दिले आहे. मात्र दिलेले आश्र्वासन न पाळता शासन आरक्षण देण्यासंदर्भात टाळाटाळ केली जात आहे. त्यामुळे मनोज जरंगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरावली सराटी येथे गत आठ दिवसापासून उपोषण सुरू केले आहे या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मराठा समाजाच्या वतीने आज दिनांक २४ सप्टेंबर रोजी धुळे सोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

मराठा आरक्षणासंदर्भात मनोज रंगे पाटील यांनी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देत संपूर्ण महाराष्ट्रभर विविध ठिकाणी विविध प्रकारचे आंदोलने करीत शासनाचे लक्ष वेधले जात आहे. तर आज रास्तारोको आंदोलन करून मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा दिला आहे. तसेच संपूर्ण महाराष्ट्रभर विविध प्रकारचे आंदोलने केल्या जात आहे. शांततेच्या मार्गाने सुरू असलेल्या उपोषण उपोषणाला आता गावागावातून पाठिंबा मिळत आहे.

### अजित पवारांनी इशारा देऊनही मोहोळमध्ये दोन पाटलांचा संघर्ष सुरूच

**सोलापूर/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस अखंड असताना आणि सध्या अजित पवार यांचा दुसरा गट अस्तित्वात असताना या पक्षात मोहोळ तालुक्यातील वजनदार नेते राजन पाटील-अनगरकर आणि पक्षाचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांच्यात सुरू असलेला संघर्ष आता टोकाला गेला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे जनसन्म ान यात्रा घेऊन मोहोळमध्ये आले असताना, त्याच मुहूर्तावर राजन पाटील यांच्या विरोधात मोहोळ बंद पुकारण्यात आला. त्यामुळे अखेर अजित पवार यांना उमेश पाटील यांच्या उपद्रवाची दखल घ्यावी लागली. मोहोळ तालुक्यात माजी आमदार राजन पाटील आणि उमेश पाटील हे दोघे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षात असताना त्यांच्यातील गटबाजी सुरूच आहे. राष्ट्रवादी एकसंघ असताना शरद पवार यांच्यासमोर आणि आता राष्ट्रवादी अजित पवार गट अस्तित्वात असताना खुद्द अजित पवार यांच्यासमोर ही गटबाजी वेळोवेळी पहावयास मिळाली आहे. परंतु पवार काका-पुतण्याने या गटबाजीकडे कानाडोळाच केला.





## तंबाखूमुक्त युवा अभियानाचा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : युवकांनी तंबाखू , सिगारेट सारख्या व्यसनापासून दूर रहावे असे आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

देशात तंबाखूमुक्त युवा अभियान राबविण्यात येणार आहेत . नवी दिल्ली येथील लेडी हार्डिग वैद्यकीय महाविद्यालयात आज २४ सप्टेबरला त्यानिमित्य आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते ..या अभियानाचा मुख्य उद्देश तरुणांना तंबाखू सेवनापासून दुर ठेवणे हा आहे तंबाखू सिगारेटमुळे होणाऱ्या आजाराविषयीची माहिती समाजाला देऊन त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे भावी पिढीच्या निरोगी आयुष्यासाठी त्यांना तंबाखू सिगारेट सारख्या व्यसनापासून ठेवण्यासाठी युवकांमध्ये तंबाखूच्या दुष्परिणामाविषयी माहिती देऊन जागृकता निर्माण करणे गरजेचे आहे अस मत केंद्रीय आयुष , आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभियानाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केलं .तंबाखू सिगारेट यासारख्या घातक उत्पादकाच्या विरोधात सरकारच्या वतीने जनजागृती करण्यात येत आहे या अभियानात सर्वांनी सहभागी होऊन याला लोक चळवळीचे स्वरूप प्राप्त करून देणे गरजे आहे . एक निरोगी आणि तंबाखूमुक्त समाज निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून सर्वांनी पुढे या आपल्या भावी पिढीच्या सुरक्षेतेसाठी तंबाखूमुक्त जीवन हा संकल्प करू या अस आवाहन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी केलं.





### *जनजागृती मोटरसायकल रॅलीला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी दाखविला झेंडा*


*तंबाखू सिगारेटच्या सेवनाचे दुष्परिणाम आणि आजाराविषयी समाजात जनजागृती करण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाच्यावतीने तंबाखूमुक्त युवा अभियान राबविण्यात येत आहे या अभियानाच्या शुभारंभ निमित्य जनजागृती मोटरसायकल रॅलीचा प्रारंभ केंद्रीय आयुष, आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी झेंडा दाखवुन केला.*

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये दोन दिवसात दोन वाघांचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी** : गोंदिया जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांमध्ये दोन वाघांचा मृत्यू नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये झाला आहे. गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात वाघ असल्याने पर्यटक सुद्धा या ठिकाणी पाहायला येत असतात. परंतु यातच आता दोन दिवसात दोन वाघांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या दोन वाघांचा मृत्यू त्यांच्या वर्चस्वाच्या लढाईत झाला आहे.





नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये २२ तारखेला गस्तीवर असलेल्या वन कर्मचाऱ्यांना T9 हा वाघ मृत अवस्थेत आढळला आणि याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानुसार सर्व वन्यजीव प्राणी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या समिती द्वारा या वाघाचा पोस्टमार्टम करण्यात आला. त्या वाघावर असलेल्या खुणांनुसार दोन वाघाच्या वर्चस्वाच्या लढाईमध्ये T9 वाघाचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. T9 वाघ हा जवळपास ११ ते १२ वर्षांचा होता आणि हा वाघ २०१६ ला गेल्या अनेक वर्षांपासून नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये होता. पुन्हा २३ तारखेला T4 वाघिणीच्या चार बछड्यांपैकी एक हा कुजलेल्या मृत अवस्थेत वन कर्मचाऱ्यांना आढळून आला. तीन दिवसांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला त्याच्या शरीरावर सुद्धा अनेक खुणा आढळून आल्या त्यामुळे नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प यामध्ये नवीन वाघाचा प्रवेश झाला असून या नवीन वाघ आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी इतर वाघांना इजा तर पोहचवत नाही ना असा प्रश्र्न या ठिकाणी उपस्थित झाला आहे. त्या दृष्टीने आता सर्व वनकर्मचारी हे रोज नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये कॅमेरे आणि गस्तीवर लावून नवीन वाघ कुठून आणि कसा असल्या बाबत माहिती घेत आहेत.